**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. ४०/२००९/ दिनांक :

श्री. सावळा ज्ञानोबा शिंदे ,
मु.पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरुध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली

**कोरम** :-१) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. के.वाय.जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे — दिनांक : १५.०७.२००९

प्रस्तुत अपील अर्ज हा अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडील तक्रार क्र. ६१८ मध्ये दि. ९.१.२००९ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द करण्यात आलेला आहे. अर्जदाराचे मूळ तक्रारीप्रमाणे म्हणणे की, अर्जदाराने घरामध्ये वीज जोडणी मिळणेसाठी दि. ५.८.२००९ रोजी कोटेशन प्रमाणे रक्कम भरली. पुढे अर्जदाराने दि. १९.१.२००९ रोजी चाचणी अहवाल दाखल केला. परंतु अंतर्गत कक्षाचा आदेश होवून देखील वि.प.ने अद्यापपर्यंत वीज जोडणी केलेली नाही. सबब भरपाईची मागणी केलेली आहे.

सदर अपिलाबाबत नोटीस काढून वि.प.कडून म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, कवठे मंहकाळ यांचेतर्फे सहाय्यक अभियंता श्री. दिवटे, उप विभाग संख म्हणणे दाखल केले. त्याप्रमाणे त्यांचे म्हणणे की, अर्जदाराने दि. ५.८.२००८ रोजी चलन भरले आहे व चाचणी अहवालही दि. १९.१.२००९ रोजी देण्यात आलेला आहे. सदर प्रकरणामध्ये ३ पोल उभे करण्याचे काम असल्याने चाचणी अहवाल दिल्यानंतर ३ महिन्यांचे काळामध्ये वीज जोडणी देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ३ पोल उभे करण्यात आलेले आहेत. त्यावर विद्युत वाहिनींचे जाळे ओढून दि. १५.७.२००९ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल असे आश्वासन दिले आहे.

आज रोजी सुनावणीचे दिवशी अर्जदारातर्फे कोणीही हजर झाले नाहीत मात्र वि.प.तर्फे सहाय्यक अभियंता, श्री. दिवटे, संख उप विभाग हजर झाले व त्यांनी बाजू मांडली. आमचेसमोर आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते की, दि. १९.१.२००९ रोजी चाचणी अहवाल दिल्यानंतर ३ महिन्यांचा काळ हा दि. १९.४.२००९ रोजी संपुष्टात येतो. या काळामध्ये अर्जदारास दि. १९.४.२००९ पर्यत वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. परंतु असे घडले नाही. म्हणून कृती मानकेमधील तरतुदीप्रमाणे अर्जदारास प्रति आठवडा रु १००/– प्रमाणे भरपाई देणे आवश्यक ठरते. आज दि. १५.७.२००९ पर्यत विलंबाचा काळ ( २०.४.२००९ ते १५.७.२००९ ) हा १२ आठवड्यांचा असल्याचे दिसून येते. परिणामी, अर्जदारास रु १२००/– भरपाई देणे आवश्यक आहे. तसेच जर अर्जदारास आज रोजी विद्युत पुरवठा करण्यात आला नाही किंवा नसेल तर येथून पुढे प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे विद्युत पुरवठा करेपर्यंत नुकसान भरपाई मिळण्याचा अर्जदारास हक्क आहे. सबब या प्रकरणी अर्जदाराचा अर्ज मं जूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश देणे आवश्यक ठरते.

## आदेश

१) अर्जदाराचा तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.तर्फे अर्जदारास विद्युत पुरवठा करण्यास १२ आठवड्यांचा विलंब झाल्याने रु. १२००/– भरपाई देण्यात यावी. तसेच जर आज रोजी विद्युत पुरवठा दिला गेला नाही तर येथून पुढे प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे विद्युत पुरवठा करेपर्यंत भरपाई देण्यात यावी.

३) या अर्जाचे खर्चाबाबत आदेश नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १५.०७.२००८

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..